## कृषि विद्या :

**माती परिक्षणाचा नमुना कसा घ्यावा ?**

जमिनीचा रंग, सुपिकता, खडकाळपणा व ऊंचसखोलपण यानुसार जमिनीचे विभाग पाडून प्रत्येक विभागात ८ ते १० ठीकाणी **V** आकाराचा खड्डे घेऊन बाजुची ३ से.मी. जाडीचा थर वरपासून खालपर्यंत तासून घ्यावा सर्व माती एकत्र चांगली मीसळून अर्धा किलो प्रतीनिधीक नमुना तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवावा.

**माती परिक्षण वर्षातुन किती वेळा करावे ?**

प्रत्येक पिक घेण्यापुर्वी तसेच रासायनिक व सेंद्रिय खाते जमिनीत टाकण्यापुर्वी मातीचा नमुना घ्यावा.

**माती परिक्षणाचा नमुना घेताना कोणती काळजी घ्यावी ?**

खालील ठीकाणचा मातीचा नमुना घेणे टाळावे- झाडाखालची जागा, जनावरे बसण्याची जागा, दलदलीची व प्राणी वनस्पतीचे अवशेष असलेली पाण्याच्या पाटाजवळची जागा.

**माती परिक्षणाबरोबर कोणती माहिती द्यावी लागते ?**

माती परिक्षणाबरोबर शेतक-यांचे नाव, गट नंबर, जमिनीचा प्रकार, मागील व पुढील घ्यावयाचे पिक इत्यादी माहिती द्यावी.

**ऊसाचे बेणे निवड कशी करावी ?**

ऊसाच्या सुधारित जाती उदा. को. ८६०३२, को.६७१, फुले २६५ चे बेणे मळ्यात वाढवीलेले १० ते ११ महिने वयाचे निरोगी, रसरशीत व शुध्द २ किंवा एक कांडीचे बेणे निवडावे.

**ऊसाकरिता कोणती बेणे प्रक्रीया करावी ?**

बेणे लागवडीपुर्वी १०० लीटर पाणी + ३०० मि.ली. मेलॅथिऑन + १०० ग्रॅम बावीस्टीन १० मिनीटासाठी बेणे प्रक्रीया केल्यानंतर १० किलो ॲसिटोबॅक्टर व १.२५ किलो स्फुरद विरघळणारे जिवाणू १०० लिटर पाण्यातून टीप-या ५ मिनीटे बुडवून लागण करावी.

**तुर व हरभ-याच्या कोणत्या सुधारित जाती आहेत ?**

तुरीच्या सुधारित जाती विपुला, बी.एस.एम.आर-७३६, बी.एस.एम.आर-८५३, आय.सी.पी.एल-८७, अमोल तर हरभ-याच्या विजय, विशाल, दिग्विजय, साकी-९५९६, कृपा, दिव्या, पी.के.व्ही-२ या रोगप्रतिकारक जातीच्या बियाण्याची निवड करावी.

**ऊसाकरिता रासायनिक खाते कशा प्रकारे विभागून द्यावीत ?**

ऊसाला खाते देताना नत्रयुक्त खाते ४ हफ्त्यात विभागून आणि स्फुरद व पालाशयुक्त खाते दोन समान हफ्त्यात विभागून द्यावीत खाते लागणीच्या वेळी ६ ते ८ आठवडयांनी, १२ ते १६ आठवडयांनी आणि मोठया बांधणी वेळी द्यावीत.

**कोणती रासायनिक खाते फवारणीतून देता येतात ?**

गहु या पिकाकरिता ०:५२:३४ हे खात ४ ग्रॅम / लिटर प्रमाणे फुलो-यात असताना व दाणे भरताना, तुरी करिता १९:१९:१९ हे रासायनिक खात ५ ग्रॅम /लिटर पाणी या प्रमाणे सोयबीन करिता २% डी.ए.पी. तर हरभ-यासाठी युरीया व पोटॅशियम नायट्रेट दाणे भरताना २% नी फवारणी केल्यास उत्पादनात वाढ होते.

**भुईमुगाला रासायनिक खते व भुसुधारकांचा वापर कसा करावा ?**

भुईमुगासाठी २० टन शेणखात प्रति हेक्टर पेरणीपुर्वी द्यावे व पेरणी करताना १०० किलो डी.ए.पी किंवा ४० किलो युरीया आणि २५० किलो सिंगल सुपर चांगले मातीत मीसळावे. याबरोबरच १२५ किलो जिप्सम लागवडीचे वेळी आणि १२५ किलो आ-या सुटताना द्यावे.

**पिकासाठी ओलावा व्यवस्थापन कसे करता येईल ?**

ओलावा व्यवस्थापनासाठी खालील पध्दतींचा अवलंब करावा:

a) जमीन सपाटीकरण करण्याचे काम पावसाळ्या पुर्वी बांधबदीस्ती करण्याच्या अगोदर करावे.

b) बंदीस्त वाफे तयार करताना जेथे पाणी मुरण्याचा वेग जास्त आहे व जमिनीला फारसा उतार नाही अशा ठीकाणी बळीराम नांगराणे किंवा ट्रॅक्टरच्या सहाय्याने ६ x १० किंवा १० x १० मीटर अंतराचे वाफे तयार करावेत.

c) मध्यम व भारी जमिनीत जेथे पाणी मुख्याचा वेग कमी आहे अशा ठीकाणी खारीप हंगामात बळीराम नांगराने ऊतारास आडवे समपातळीत तास घालावेत त्यामुळे जमिनीत स-या वरंबे तयार होतील. उतार जास्त असेल तर मुख्य वरंबे उताराला आठवे व बंदीस्त वरंबे उताराच्या दिशेने ठेवावेत. मुख्य वरंब्याची लांबी ६ मी व ऊंची १२ इंच ठेवावी आणि बंदीस्त वरंब्याची ३ मीटर अंतर ठेवावे.

d) शेतावर सर्व मशागतीची कामे (उदा. नांगरणी, वखरणी, पेरणी कोळपणी)उताराला आडवी व समपातळीत करावी.

e) जैविक बांध निर्मिती ही उतारानुसार ठरावीक अंतरावर गवताची लागवड करावी यासाठी मद्रास अंजन, मारवेल, मोळ, नीलगवत इत्यादी गवताचा वापर करावा.

f) खारीप, रब्बी व उन्हाळी अशा तिनही हंगामामध्ये आच्छादनाचा वापर करावा यासाठी गव्हाचा भूसा धसकटे, ऊसाचे पाचट, टाकाऊ कडबा, पालापाचोळा व प्लॅस्टिक पेपरचा वापर करावा.

**रान बांधणीचे प्रकार व त्याची वैशिष्टये**

| अ.नं. | रानबांधणीचा प्रकार | सर्वसाधारण मापे | जमिनीचा ढाळ | पाण्याचा प्रवाह | सर्वसाधारण पिके |
|---|---|---|---|---|---|
| १. | वाफे पध्दत | २ ते ४ मी. रूंदी | ०.६% पेक्षा कमी | ६ लिटर प्रति सेकंद | कडधान्ये, अन्नधान्ये, तेलबिया, कापसा व्यतिरिक्त फळझाडे, भाजीपाला |
| २. | सारे पध्दत | २ ते ३ मी रूंदी ४०-६० मी. लांबी | ०.६ % पेक्षा कमी | २ लिटर / सेकंद /मी./रूंदी | ज्वारी, बाजरी, कडधान्ये, अन्नधान्ये, तेलबिया |
| ३. | सरी वरंबा पध्दत | ०.६ ते १.० मी. रूंदी ६० ते १०० मी. लांबी | ०.६% लांबी पेक्षा कमी | १ लिटर / सेकंद / सरी | केळी, ऊस, कपाशी, नगदी पिके |
| ४. | आळे पध्दत | २ ते ३ मी. व्यास | ०.६% पेक्षा कमी | ६ लिटर /सेकंद | पूर्ण वाढीच्या अवस्थेपर्यंत फळझाडे |
| ५. | समपातळीत रानबांधणी | क्र. १ ते ३ प्रमाणे वैशिष्टये | | | |

**कडधान्ये, तृणधान्ये व ऊसाकरिता कोणत्या जीवाणूसंवर्धक खताचा वापर करावा व किती प्रमाणात ?**

| अ.क्र. | पिकाचे नाव | जिवाणू खताचे नाव | वापराचे प्रमाण | वापरायची पध्दत |
|---|---|---|---|---|
| १. | ज्वारी, गहु, मका, कापूस, सुर्यफुल, बाजरी, भात, करडई | ॲझोटोबॅक्टर<br><br>स्फुरद विरघळविणारे जीवाणू | २५ ग्रॅम / किलो बियाणे<br><br>२५ ग्रॅम / किलो बियाणे | पेरणीपुर्वी बियाण्यास गुळाच्या थंड पाण्याच्या द्रावणातून चोळावे. |
| २. | हरभरा, तूर, भुईमुग, मुग, उडीद, सोयबीन | रायझोबियम<br>स्फुरद विरघठविणारे जीवाणू | २५ ग्रॅम / किलो बियाणे | पेरणीपुर्वी बियाण्यास गुळाच्या थंड पाण्याच्या द्रावणातून चोळावे. |
| ३. | ऊस | असिटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जीवाणू | १० किलो / हे. व १.२५ कि./हे | १०० लिटर पाण्यात मिसळून बेणे ५ मि. बुडवून लागन करावी. |

**प्रमुख कडधान्य पिकासाठी खत मात्रा कधी व किती प्रमाणात द्याव्यात ?**

| अ.क्र. | पिकाचे नाव | खताचे नाव | प्रति हे. द्यावयाची मात्रा (कि. ग्रॅम मध्ये) | खते द्यावयाची वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | हरभरा | डी.ए.पी<br>एम.ओ.पी | १२५<br>५० | पेरणीच्या वेळी बियाण्या लगत |
| २. | तूर | डी.ए.पी | १२५ | पेरणीच्या वेळी बियाण्या लगत |
| ३. | मुग व उडीद | डी.ए.पी. | १०० | पेरणीच्या वेळी बियाण्या लगत |

**प्रमुख तृणधान्य पिकासाठी खत मात्रा कधी व किती प्रमाणात द्याव्यात ?**

| अ.क्र. | पिकाचे नाव | खत | प्रति हे. खत मात्रा | खत देण्याची वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | भात | युरिया | १०९<br>१०९ | पेरणी वेळी<br>पेरणी नंतर ३० दिवसांनी |
| | | सिंगल सुपर फॉस्फेट | ३१.३ | पेरणी वेळी |
| | | एम.ओ.पी | ८३ | पेरणी वेळी |
| २. | रब्बी ज्वारी बागायती | युरिया | १०८ | पेरणी वेळी |
| | | | १०८ | पेरणी नंतर एक महिन्यांनी |
| | | सिंगल सुपर फॉस्फेट | ३१३ | पेरणी वेळी |
| | | ए.ओ.पी | ८३ | पेरणी वेळी |
| | कोरडवाहू | युरिया | १३० | पेरणी वेळी |
| | | एस.एस.पी | १८८ | पेरणी वेळी |
| ३. | गहू | युरिया | १३०<br>१३० | पेरणी वेळी<br>पेरणी नंतर २१ दिवसांनी |
| | | एस.एस.पी. | ३७५ | पेरणी वेळी |
| | | एम.ओ.पी. | ६६ | पेरणी वेळी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | मका | युरिया | ८७ | पेरणी वेळी |
| | | युरिया | ८७ | पेरणी नंतर ४० दिवसांनी |
| | | एम.ओ.पी | ६६ | पेरणी वेळी |
| | | एस.एस.पी. | ३७५ | पेरणी वेळी |

**प्रमुख तेलबिया पिकासाठी खात मात्रा कधी व किती प्रमाणात द्याव्यात ?**

| अ.क्र. | पिकाचे नाव | खाताचे नाव | मात्रा / हे. | खात द्यावयाची वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | भुईमुग | युरिया | ५५ | पेरणी वेळी |
| | | एस.एस.पी. | ३१३ | पेरणी वेळी |
| २. | सोयाबीन | युरिया | १०९ | पेरणी वेळी |
| | | एस.एस.पी | ४६९ | पेरणी वेळी |
| ३. | सुर्यफुल (बागायती) | युरिया | ६५ | पेरणी वेळी |
| | | | ६५ | पेरणी नंतर एक महिन्योनी |
| | | एस.एस.पी. | १८८ | पेरणी वेळी |
| | | एम.ओ.पी | ५० | पेरणी वेळी |
| ४. | करडई | युरिया | ११० | पेरणी वेळी |
| | | एस.एस.पी. | १५६ | पेरणी वेळी |
| | | एम.ओ.पी. | ४३ | पेरणी वेळी |
| ५. | तीळ | युरीया | ५४ | पेरणी वेळी |
| | | | ५४ | पेरणी नंतर ३ आठवडयांनी |

# पिक संरक्षण :

**किडी म्हणजे काय** ?

ज्या प्राणीला सहा पाय असतात त्याला किड म्हणतात.

**डाळिंबावरील तेल्या रोग कशामुळे होतो**?

हा रोग जिवाणूजन्य असून, झान्थोमोनस या जिवाणूमुळे होतो.

**तेल्या रोगाचे लक्षणे कुठे दिसतात ?**

तेल्या रोगाचा प्रादुर्भाव पाने, फुले, खोड आणि फळांवर दिसतात.

**तेल्या रोग होण्यास अनुकुल बाबी**?

- बागेत किंवा बागेशेजारी तेल्या रोगाचे अवशेष असणे.
- बागेत अस्वच्छता असणे म्हणजेच तणांची मोठया प्रमाणावर वाढ असणे.
- झाडांची गर्दी, खेळत्या हवेचा तसेच सुर्यप्रकाशाचा अभाव असणे.
- ढगाळ व पावसाळी हवामान, वादळी पाऊस आणि वातावरणातील आर्द्रता जास्त असणे.
- रोगग्रस्त बागेतील गुटी कलमांचा वापर.

**तेल्या रोगांचे व्यवस्थापन कसे करावे.**

- छाटणीनंतर लगेचच १ टक्का बोर्डो मिश्रणाची पहिली फवारणी करावी.
- पहिल्या फवारणीनंतर खोडावर दोन फुटापर्यंत आणि छाटलेल्या खोड, फांद्यावर कॉपर ऑक्सिक्लोराइड १५ ग्रॅम + कार्बारील ६ ग्रॅम + डी.डी.व्ही.पी. ३ मि.ली. + स्टिकर १ मि.ली. प्रती १ लिटर पाण्यात मिश्रण करून ब्रशच्या सहाय्याने मुलामा द्यावा.
- बागेत जमिनीवर ब्लिचींग पावडरची धुरळणी करावी किंवा कॉपर डस्ट ४ % (२० कि./हेक्टर) धुरळणी करावी.
- पानगळ आणि छाटणीनंतर बॅक्टीरियानाशक ५ ग्रॅम + कॅप्टन २० ग्रॅम / १० लिटर पाणी प्रमाणे फवारावे.
- नविन पालवी फुटल्यानंतर बॅक्टीरीयानाशक २.५ ग्रॅम + कॅप्टन २० ग्रॅम / १० लिटर पाण्यात फवारावे.
- पानावर आणि फळावर रोगाचा प्रार्दुभाव दिसत असेल तर फवारणी चालू ठेवावी आणि रोग नसेल तर ३० दिवसांचे अंतराने फवारावी.

**डाळिंबावरील मर रोग दिसून आल्यास काय करावे ?**

मर रोगाचे लागण दिसून आल्यास ताबडतोब डेक्झॅकोनॅझोल १५ ग्रॅम / १० लिटर किंवा प्रोपीकोनॅझोल १५ ग्रॅम / १० लिटर किंवा बाविस्टीन २० ग्रॅम / १० लिटर यापैकी कोणतेही एक आणि त्या क्लोरोपायरीफॉस ५० मि.ली./१० लिटर द्रावण ५ लिटर / खड्डा /झाड रींग पध्दतीने ओतावे.

**डाळिंबावरील रस शोषणा-या किडीच्या नियंत्रणासाठी काय फवारावे.**

फुलकिडी नियंत्रणासाठी स्पिनोसॅड २.५ मि.ली. किंवा ॲसिटॅमिप्रिड ५ ग्रॅम, मावा किडीस ईमिडाक्लोप्रीड ३ मि.ली. तसेच पिठया ढेकूणाच्या नियंत्रणासाठी व्हर्टीसिलीएम लेकॅनी ६० ग्रॅम, ५० मि.ली. दुधात मिसळून प्रार्दूभाव दिसताच १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावे.

**डाळिंबावरील फळे पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी काय फवारावे ?**

फळे पोखरणा-या अळीसाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ एस.जी. ५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फळधारणा झाल्यानंतर २० दिवसांच्या अंतराने २ वेळा फवारणी करावी.

**कांद्यावरील करपा व थ्रिप्स (फुलकिडे) यांच्या एकत्रित नियंत्रणासाठी काय करावे.**

कांदा लागवडीनंतर १०-१५ दिवसांनी व १५ दिवसांच्या अंतराने चार फवारण्या डायथेन एम-४५ २० ग्रॅम किंवा बाविस्टीन १० ग्रॅम हे बुरशीनाशक व फिप्रोनिल १५ मि.ली. किंवा प्रोफेनोफॉस १० मि.ली. या कीटकनाशकाच्या आलटून पालटून आणि चिकट द्रव्याचा वापर करून १० लिटर पाण्यात फवारावे.

**मिरचीवरील बोकड्या रोग व्यवस्थापनासाठी काय करावे ?**

या रोगाचा प्रसार फुलकिडे, मावा आणि कोळी या रस शोषून घेणा-या किडीमार्फत होतो. रोगाच्या नियंत्रणासाठी रोप लागवडीनंतर २५ दिवसांनी १० लिटर पाण्यात डायथेन एम-४५ (२५ ग्रॅम) + पाण्यात विरघळणारे गंधक ३० ग्रॅम + प्रोफेनोफॉस १० मि.ली. यांचे मिश्रण दर १५ दिवसांनी ४ ते ५ फवारण्या कराव्यात.

**टोमॅटोवरील नागअळीचे (लिफ मायनर) नियंत्रण कसे करावे ?**

रोपांवर वरचेवर ४% लिंबोळी अर्काच्या २ ते ३ फवारण्या कराव्यात. पिकावर या अळीचे प्रमाण वाढल्यास डेल्टामेथ्रीन ४ मि.ली. / १० लिटर पाण्यात मिसळून १ ते २ फवारण्या कराव्यात.

**टोमॅटोवरील फळे पोखरणारी अळीचे व्यवस्थापन कसे करावे ?**

- कामगंध सापळे १० / हे. लावावेत.
- एच.एन.पी.व्ही. अळीचे प्रादुर्भाव दिसून आल्यावर एच.एन.पी.व्ही. २५० एल.ई. विषाणू अर्क (५०० मि.ली.) प्रति हेक्टरी अधिक, कोंबडीची अंडी १० नग (फक्त पांढरा बल्क) गुळ २.५ किलो (बारीक करून) आणि निळ पावडर ५० ग्रॅम, ५०० लिटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी करावी आणि दुसरी फवारणी १५ दिवसाच्या अंतराने करावी.

**सापळे आणि एच.एन.पी.व्ही. कुठे उपलब्ध आहे ?**
हे सर्व साहित्य कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर येथे विक्रीसाठी उपलब्ध आहे.

**वांगीवरील शेंडे व फळे पोखरणारी अळीचे व्यवस्थापन कसे करावे?**

- अळीच्या प्रादुर्भव दिसून आला तर शेंडा खुडणी करावी.
- कामगंध सापळे १० / हे. लावून अळ्यांचे प्रौढ नर पतंग पकडुन नष्ट केल्यास किडीची संख्या नियंत्रणात ठेवता येते.
- लागवडीनंतर दोन महिन्यांनी किडलेले शेंडे व फळे आढळल्यास ती गोळा करून नष्ट करावीत तसेच ४ टक्के निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रिन (२५%) ५ मि.ली. किंवा सेविन ४० ग्रॅम / १० लिटर पाण्यातून फवारावे.

**वांगीवरील कोळी आढळल्यास काय करावे ?**
वांगीवरील कोळी आढळल्यास पाण्यात मिसळणारे गंधक ३० ग्रॅम किंवा डायकोफॉल २० मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारावे.

**पिकावर पांढरीमाशी व्यवस्थापनासाठी काय करावे ?**
पांढरीमाशीसाठी पिवळे चिकट सापळे २० प्रति एकर या प्रमाणे लावावेत.

**भेंडीवरील तुडतुडे, पांढरीमाशी व फुलकिडे व्यवस्थापनासाठी काय करावे ?**
रस शोषणारी किडीसाठी इमिडॅक्लोप्रिड ४ मि.ली. किंवा थायमेथोक्झाम ४ ग्रॅम किंवा मिथाईल डिमेटॉन १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

**भेंडीवरील शेंडे व फळे पोखरणा-या अळीचे व्यवस्थापन कसे करावे.**

- कामगंध सापळे १० प्रति हेक्टरी घाटेअळी व शेंडअळी साठी लावून अळ्यांचे प्रौढ नर पतंग पकडुन नष्ट करावे.
- घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यावर एच.एन.पी.व्ही. २५० एल.ई. विषाणू अर्क (५०० मि.ली.) प्रति हे. अधिक कोंबडीची अंडी १० नग (फक्त पांढरा बल्क), गुळ २.५ किलो (बारीक करून) आणि निळ पावडर ५० ग्रॅम, ५०० लिटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी करावी आणि दुसरी फवारणी १५ दिवसाच्या अंतराने करावी.
- रासायनिक किटकनाशक प्रोफेनॉफॉस १० मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ३ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

**दोडकावरील नागअळी व्यवस्थापन कसे करावे ?**
निंबोळी अर्क ४ टक्के किंवा ट्रायअॅझोफॉस २० मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारूण व्यवस्थापन करावे.

**दोडके, कारली, काकडी, खरबुज व कलिंगड वरील फळमाशीचे व्यवस्थापन कसे करावे ?**

- कामगंध सापळे ५ / एकरी लावावेत.
- तसेच रोगर २० मि.ली. + १०० ग्रॅम गुळ + १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**हरभ-यावरील घाटेअळीचे व्यवस्थापन कसे करावे.**

- कामगंध सापळे १० प्रति हे. लावून अळ्यांचे प्रौढ नर पंतग पकडुन नष्ट करावे.
- मोठया अळ्या वेचून खाण्यासाठी पक्ष्यांना बसण्याकरिता बांबू इत्यादी वस्तुच्या लाकडी छत्र्या (अटीने) बनवुन त्या एका हेक्टरला ७-१० छत्र्या शेतात उभ्या कराव्यात.
- घाटेअळीच्या प्रादुर्भाव दिसून आल्यावर एच.एन.पी.व्ही. २५० एल.ई. विषाणू अर्क (५०० मि.ली.) प्रति हेक्टरी अधिक, कोंबडीची अंडी १० नग (फक्त पांढरा बल्क), गुळ २.५ किलो (बारीक करून) आणि निळ पावडर ५० ग्रॅम, ५०० लिटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी करावी आणि दुसरी फवारणी १५ दिवसाच्या अंतराने करावी.

**हरभरावरील मर रोग व्यवस्थापनासाठी काय करावे ?**

विजय किंवा दिग्विजय हे मर रोग प्रतिकारक्षम जातीच्या वापर करा किंवा स्थानिक जात्यांना पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाण्यास २ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बावीस्टीन किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा याची बीज प्रक्रिया करावी.

**तुरीवरील शेंगा पोखरणा-या अळींचे व्यवस्थापन कसे करावे ?**

- फुलकळी लागतांना पहिली फवारणी निंबोळी अर्क (५ टक्के) २५ किलो / हेक्टर, दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२-१५ दिवसांनी एच.एन. पि. व्ही.  २५० एल.ई. विषाणू अर्क (५०० मि.ली.) प्रति हेक्टरी अधिक, कोंबडीची अंडी १० नग (फक्त पांढरा बल्क), गुळ २.५ किलो (बारीक करून) आणि निळ पावडर ५० ग्रॅम, ५०० लिटर पाण्यात मिसळून करावी आणि तिसरी फवारणी १५ दिवसाच्या अंतराने करावी.
  आणि गरजेनुसार चौथी फवारणी क्लोरपायरीफॉस २५ मि. ली. अथवा पॉलीट्रीन २० मि.ली. किंवा प्रोफेनोफॉस ५०% ई.सी. १५ मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारावे.
- कामगंध सापळे १० प्रति हे. लावून अळ्यांचे प्रौढ नर पंतग पकडुन नष्ट करावे.
- मोठया अळ्या वेचून खाण्यासाठी पक्ष्यांना बसण्याकरिता बांबू इत्यादी वस्तुच्या लाकडी छत्र्या (अटीने) बनवुन त्या एका हेक्टरला ७-१० छत्र्या शेतात उभ्या कराव्यात.

**भुईमुगात टिक्का व तांबेरा रोगासाठी काय करावे ?**

प्रादुर्भाव झाल्यास २५ ग्रॅम मॅक्नोझेब (डायथेन एम-४५) किंवा बाविस्टीन १० ग्रॅम १० लिटर पाण्यातून फवारावे.

**सोयाबीन वरील पाने गुडाळणा-या अळ्यांचे नियंत्रण कसे करावे ?**

डायमेथोएट २० मि.ली. किंवा क्लोरोपायरीफॉस २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**सुर्यफुलावरील केसाळ अळीचे नियंत्रण कसे करावे ?**

अळींच्या नियंत्रणासाठी अळ्यांचे पुंजके वेचून राकेल मिश्रीत पाण्यात टाकून त्यांच्या नाश करावा किंवा क्विनॉलफॉस १.५% किंवा कार्बारिल १०% भुकटी २५ किलो प्रति हेक्टरी वारा शांत असताना धुरळावी.

**सोयाबीन व सुर्यफुलावरील पाने खाणारी अळी व घाटे अळी च्या व्यवस्थापन कसे करावे ?**

- एच.एन.पी.व्ही. २५० एल.ई. विषाणूची फवारणी, अंडी, गुळ, निळ मिसळून ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- कामगंध सापळे १० प्रति हे लावावेत.
- बांबू मचान ७-१० प्रति हे. उभ्या कराव्यात.

**करडईवरील मावा नियंत्रण कसे करावे ?**

- करडईची पेरणी सप्टेंबरच्या दुस-या पंधरवडयात केली असता किडीचा प्रादुर्भाव बराच कमी होतो.
- किडी दिसून आल्यानंतर रोगर ७२५ मि.ली. ५०० लिटर पाण्यात किंवा ॲक्ट्रा १०० ग्रॅम किंवा प्राईड / मानिक १०० ग्रॅम ५०० लीटर पाण्यातून फवारावे.

**आंबावरील मोहराचे संरक्षणासाठी काय करावे ?**

- मोहराचे संरक्षणासाठी १०% कार्बारील व ३०० मेश गंधक यांची समप्रमाणात (१:१) मिसळून ४ ते ५ वेळा धुरळणी करावी.
- तुडतुडे व भुरी व्यवस्थापनासाठी :
  पहिली फवारणी : सायपरमेथ्रीन २५% २ मि.ली. / १० लिटर पाण्यात.
  दुसरी फवारणी : कार्बारील ५०% २० ग्रॅम + कार्बेन्डझीम १० ग्रॅम / १० लिटर पाण्यात.
  तिसरी फवारणी : इमिडॅक्लोप्रिड ३ मि.ली. व हेक्झाकोनॉझोल २० मि.ली. / १० लिटर पाण्यात.
  चौथी फवारणी : मेथील डेमेटॉन १० मि.ली. + बुरशीनाशक वरील प्रमाणे.

**केळीवरील करपा (सिगाटोका) रोगाचे नियंत्रण कसे करावे ?**

- रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जाळावीत.
- झाडावर १० ग्रॅम कार्बेन्डॉझिम किंवा २५ ग्रॅम डायथेन एम-४५ किंवा २५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा १० मि.ली. ट्रायडेमॉर्फ अधिक चांगल्या प्रतीचे स्टीकर १० लीटर पाण्यात मिसळून फवारावे.

**द्राक्षावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी काय फवारावे ?**

फुलकिडीच्या नियंत्रणासाठी थायोनेथाक्झाम २५ डब्ल्यु.जी. ३ ग्रॅम किंवा स्पिनोसॉड ४५% एस.पी. ३ मि.ली. किंवा फिप्रोनील ५% एस.सी. १५ मि.ली. यापैकी एका कीटकनाशकांची १५ दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात.

**द्राक्षावरील केवडयाच्या रोगाचे नियंत्रण कसे करावे ?**

केवडयाच्या नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झील -मॅक्कोझेब (०.२%) किंवा सायमोक्झॉनील-मॅन्कोझॅब (०.२%) या बुरशीनाशकांच्या ५ फवारण्या छाटणीनंतर १२ दिवसांचे अंतराने कराव्यात.

**द्राक्षावरील मिलीबग नियंत्रणासाठी काय करावे ?**

मिलीबगच्या नियंत्रणासाठी व्हर्टिसीलीयम लेकॅनी (फुले बगीसाईड) ५ ग्रॅम + ५ मि.ली. दुध / लिटर पाणी या प्रमाणात १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात.

**द्राक्षावरील भुरी रोगासाठी काय करावे ?**

भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ८०% पाण्यात विरघळणारे गंधक २० ग्रॅम किंवा डॅनोकॅप ५ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा ट्रायडेमिफॉन २५० ग्रॅम किंवा पेनकोनॅझॉल ५ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**गांडुख खात म्हणजे काय ?**

गांडुळानी सेंद्रिय पदार्थ खावून बाहेर टाकलेली विष्टा, अर्धपचन झालेले सेंद्रिय पदार्थ त्यांची अंडी किंवा ककुन पदार्थास गांडुळखात म्हणतात.

**गांडुळाची कोणत्या जाती खत निर्मितीसाठी फायदेशीर आहे** ?
इसिनिया फिटेडा आणि युडे्रलिस युजेनी.

**गांडुळाची जाती विक्रीसाठी कुठे उपलब्ध आहे** ?
युडे्रलिस युजेनी ही जाती कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर येथे ४० पैसे प्रति नगा प्रमाणे उपलब्ध आहे.

**पिकासाठी गांडुळखताचे एकरी प्रमाण किती वापरावे** ?
२ टन प्रति एकरी.

**गांडुळखात निर्मितीसाठी शेडची गरज असते काय** ?
होय.

**रेशिम उद्योग म्हणजे काय** ?
रेशीम अळीला तुतीचा पाला देऊन रेशीम कोषाची निर्मिती करणे, म्हणजे रेशिम उद्योग.

**तुतीची कोणती जाती चांगली आहे** ?
V-1, S-1635

**रेशिम उद्योगापासून वार्षीक उत्पन्न किती मिळते** ?
तिस-या वर्षानंतर ५०,०००-१,००,०००/- वार्षीक उत्पन्न मिळते.

**रेशीम किडीची अंडी व तुतीचे बेणे कुठे उपलब्ध आहे** ?
रेशीम किडीची अंडीपुंज व तुतीचे बेणे जिल्हा रेशीम कार्यालय मार्फत पुरवठा केली जाते.

**एकात्मिक किड व्यवस्थापन म्हणजे काय** ?
मशागतीचे उपाय, जैविक, भौतीक, यांत्रिक व रासायनिक उपाय वापरून किडीचे व्यवस्थापन.

**कोण कोणत्या किटकनाशके बंद झाले आहे** ?
बी.एच.सी., डी.डी.टी. फॅसफोमिडॉन, एन्डोसल्फॉन, मोनोक्रोटोफॉस.

**हुभणी किडीचे व्यवस्थापन कसे करावे ?**
निंबोळी पेंड २५ किलो / हे. किंवा फोरेट २० कि./हे. पेरणीच्या वेळेस मातीत मिसळून व्यवस्थापन करावे.

**एकात्मिक किड व्यवस्थापनाचे साहित्य कुठे उपलब्ध आहे** ?
सर्व साहित्य कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर येथे विक्रीसाठी उपलब्ध आहे.

**गांडुळ खत कुठे उपलब्ध आहे** ?
गांडुळ खत कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर येथे ४ रूपये प्रति किलो प्रमाणे विक्रीसाठी उपलब्ध आहे.

# उद्यान विद्या :

**डाळिंबाची नवीन बाग लागणीसाठी योग्य जात व रोपे कुठून घ्यावेत ?**
डाळिंबाची फुले भगवा ही जात लावावी, त्यासाठी तेल्यामुक्त बागेतून तयार केलेली रोपे शासकीय किंवा अधिकृत रोप वाटीकेतूनच रोपे घ्यावीत.

**डाळिंबाची लागण केल्यानंतर छाटणी कशी व केव्हा करावी ?**
डाळिंबाची लागण झाल्यानंतर दोन वर्षानंतरच झाडाची छाटणी करावी तोपर्यंत फक्त बहूखोड पध्दत (३-४ खोडे)साठी खोडांची काढणी करावी.

**तेल्या रोगांच्या नियंत्रणासाठी डाळिंब बागेत काय करावे ?**
बागेची स्वच्छता ठेवावी, तेल्यायुक्त फळे, पाने, काडया बागेबाहेर काढून जाळून टाकावेत कृषि शास्त्रज्ञांच्या सल्लयाने बागेचे बहार नियोजन करावे.

**डाळिंबामध्ये पाणी नियोजन कसे करावे ?**
डाळिंबाला अत्यंत कमी पाण्याची गरज गसते, म्हणजे कमीत कमी १४ लीटर ते जास्तीत जास्त ३५ लिटर पाणी प्रति झाड लागते. बहाराप्रमाणे व जमीनीच्या मगदुराप्रमाणे पाण्याचे नियोजन (प्रति लिटर / झाड) करावे.

**बहारनियोजनासाठी पानगळ कशी करावी ?**
बहार धरताना काडीमध्ये अन्नसंचय होणे गरजेचे असते त्यासाठी पानगळ महत्वाची आहे. पानगळीसाठी २ मी.ली. इथ्रोल किंवा ५ ग्रॅम थायोयुरिया + ५ ग्रॅम डि.ए.पी. प्रति लिटर पाण्यात मिसळून झाडावर फवारणी करावी.

**डाळिंबामध्ये अन्नद्रव्ये व्यवस्थापन कसे करावे ?**
डाळिंबाची छाटणीच्या वेळेस डि.ए.पी. १ किलो + पोटॅश ३०० ग्रॅम + निंबोळी पेंड १ किलो + ५० ग्रॅम झिंक + ५० ग्रॅम मॅग्नेशिअम + ५० ग्रॅम फेरस सल्फेट प्रति झाड द्यावे. त्यानंतर प्रत्येक महिन्यात एक बेसल डोस द्यावा. पानगळीनंतर ५ व्या महिन्यापासून ड्रिपमार्फत विद्राव्य खाते द्यावीत, त्यासाठी तज्ञांचा सल्ला द्यावा.

**डाळिंबामध्ये खोड मजबुत करणेसाठी काय करावे ?**
खोड मजबुतीकरीता एम.एच-४० (१० ग्रॅम) + मोरचूद १ किलो + 5 लिटर पाणी, चुनकळी १ किलो + ५ लिटर पाणी नंतर एकूण १०० लिटर द्रावण तयार करावे + काव (गरजेप्रमाणे) मिसळून पेस्ट खोडावर लावावी.

**डाळिंबामध्ये फळांचा आकार व दर्जा वाढविण्यासाठी काय करावे ?**

- पहिली फवारणी-५ ग्रॅम ६ बी.ए. + १ किलो युरिया + अर्धा किलो मॅग्नेशिअम सल्फेट + १०० लिटर पाणी मिसळून फवारणी करावी.
- दुसरी फवारणी ङ्घ १०० मी.ली. सी.सी.सी. + अर्धा किलो पोटॅशीअम डाय ऑर्थोफॉस्टेप + १०० ग्रॅम बोरॉन + १०० लिटर पाणी मिसळून.

**डाळिंबातील फुलगळ थांबविणेसाठी काय करावे ?**
फुलगळ थांबविणेसाठी २.५ ग्रॅम १३:०:४५ ($KNo_3$) + 2 मी.ली. नायट्रोबेन्झीन (२०%) प्रति लिटर पाण्यात मिसळून १-२ फवारण्या कराव्यात.

**डाळिंबाची फळे भेगाळण्यावर काय उपाय करावेत ?**
G.A. ४ ग्रॅम + ॲसीटोन + ५ ग्रॅम बोरॉन प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी व नंतर १५ दिवसांनी ०.४ % बोर्डोमिश्रण तयार करून फवारावे.

**केळी लागण करायची आहे तरी जात, लावणीचे अंतर व हंगाम सांगा ?**

केळी लागण ही **टिशू कल्चर युक्त** G-९ (ग्रँड नैन) ही जात निवडावी. लागवडीसाठी ६ X ६, ७ X ५ किंवा ७ X ६ फुट या अंतराचा वापर करावा. बाजारपेठेतील भाव, पाण्याची उपलब्धता व व्यवस्थापनावश्यक गोष्टीप्रमाणे हंगाम निवडावा. हंगाम:जून-जुलै, ऑक्टोबर-नोव्हेंबर.

**केळीवरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कोणती उपाययोजना करावी ?**

केळी बागेची स्वच्छता ठेवावी. तणे नष्ट करावीत बागेमध्ये पावर टिलरच्या सहाय्याने बोध (गादी वाफा) तयार करून घ्यावेत. रोगग्रस्त पाने काढावीत. बाविस्टीन २ ग्रॅम /लिटर + डायथेन एम-४५ २ ग्रॅम / लिटर किंवा रिडोमील १ ग्रॅम / लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**केळीमधील उत्पादनवाढीसाठी खतांचे नियोजन कसे करावे ?**

केळीमध्ये फर्टीगेशनसाठी खतांची मात्रा व कालावधी खालीलप्रमाणे द्यावी.

नत्र : २०० स्फुरद : ६० पालाश : २८० ग्रॅम प्रति झाड

| खते देण्याचा कालावधी | ग्रेड | एकूण खते (कि.ग्रॅ.) | हेक्टरी ४४४ झाडास (किलोऋ |
|---|---|---|---|
| रोपे लागवडीपासून ५ ते ६५ दिवस | यूरिया +<br>१६:६१:० +<br>०:०:५० | ८२.६०<br>६०<br>१०० | ४.१३०<br>३.००<br>५.०० |
| ६५ ते १२५ दिवस | यूरिया +<br>१२:६१:० +<br>०:०:५० | १२०<br>४०<br>१०० | ६.००<br>२.००<br>५.०० |
| १३५ ते १६५ दिवस | यूरिया +<br>०:०:५० | ६५<br>६० | ६.५<br>६.० |
| १६५ ते ३१५ दिवस | यूरिया +<br>०:०:५० | १५०<br>३०० | ३.०<br>६.० |

**केळी फळाचा घेर वाढून लांबी व वजन वाढविण्यासाठी घडावर कोणती फवारणी घ्यावी ?**

केळी फळाचा घेर वाढविण्यासाठी ङ्ख पी.डी.एच. ८ पोटॅशिअम डाय हायड्रोजन फास्फेट ५ ग्रॅम / लिटर + युरिया -१० ग्रॅम / लिटर + १० मि.ली. स्टिकर / लिटर पाण्यात मिसळून केळफुल कापल्यानंतर घडावर १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या घ्याव्यात.

**केळी बागेचे वा-यापासून संरक्षण करावयाचे आहे ते कसे करावे ?**

केळी लागवडीपूर्वी फुले जयवंत, फुले यशवंत सारखी लवकर वाढणारी गवते ड्रीपची लॅटरल टाकून चहूबाजूंनी लावावीत व एक दोन क्टींग कराव्यात जेणेकरून जास्तीत- जास्त फुटवे येऊन केळी बागेचे वा-यापासून संरक्षण होईल.

**सरासरी उत्पादनासाठी केळीच्या घडाचे वजन किती असावे ?**

सरासरी एकरी ४० टन उत्पादनासाठी ३० ते ३२ किलो घडाचे वजन अपेक्षित आहे.

**कांदा पिकाची पूर्नलागवड रोपे टाकल्यानंतर कधी करावी ?**

खरीपात रोपे ४० ते ४५ दिवसात तर रब्बी हंगामात ५०-५५ दिवसांत लागवडीस तयार होतात. लागवडीवेळी रोपांची गाठ लहान हरभ-याएवढी झाली पाहिजे.

**कांदामध्ये पूर्ण तण नियंत्रण करणेसाठी काय करावे ?**

कादा लागणीनंतर १५-१८ दिवसात १.२५ मि.ली. गोल + १.५ मी.ली. व्हिप सूपर प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**कांदामध्ये आम्ही खते खुरपणीच्या वेळेस म्हणजे लागवडीनंतर ३०-३५ दिवसांनी टाकतो ते योग्य आहे का ?**

नाही. कांद्यामध्ये अधिक उत्पादनासाठी लागवडीच्या वेळेसच खाते द्यावीत. त्यासाठी कांदाचे रान तयार करताना सरी टाकते वेळी एकरी ८० किलो १०:२६:२६ व ४० किलो युरिया द्यावे व ३० दिवसानंतर उरलेला ४० किलो युरिया खुरपणीच्या वेळेस द्यावा. लागवडीवेळेसच १० किलो सल्फर + १५ किलो मॅग्नेशिअम सल्फेट + १० किलो झिंग सल्फेट + २ किलो सिलीकॉन शेणखतामध्ये द्यावेत.

**कांद्यावरील करपा रोगासाठी काय करावे ?**

कांद्यावरील करपा रोगासाठी सापळा पीक म्हणून मका लावावी. फवारणीसाठी बावीस्टीन २ ग्रॅम / लिटर पाणी + २ ग्रॅम सिलीकॉन + १.५ ग्रॅम डायथेन एम-४५ प्रति लिटर पाण्यात वापरावे.

**शेवगा पिकांच्या जाती विषयी माहिती हवी होती ?**

शेवगामध्ये सध्या प्रचलित पि.के.एम-१, पि.के.एम-२, CO-१, CO-२ इत्यादी जाती आहेत. कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर मध्ये 'भाग्या' या बागलकोट हार्टिकल्चर युनिर्व्हसिटी ची नविन संशोधित जातीचे बियाणे उपलब्ध आहे.

**काकडीची लागण कशी व केव्हा करावी ?**

काकडीची लागण ही जानेवारी-फेब्रुवारी किंवा जुन-जुलै किंवा ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये करावी. काकडी हे वेलवर्गीय पिक खाते व पाणी व्यवस्थापनास खुप चांगला प्रतिसाद देते. त्यासाठी गादी वाफे तयार करून ड्रीप लॅटरल चा वापर करून काकडीच्या जोड ओळी मध्ये लागण करावी.

**काकडीतील कळी (मिडू) जळणे, करपणे यासाठी काय उपाय योजना कराव्यात ?**

यासाठी रिडोमील १ ग्रॅम / लिटर पाणी या प्रमाणे ड्रिपमार्फत ड्रेंचिंग करावी तसेच ड्रिपमधूनच १ लिटर $CaNO_3$ + १ किलो बोरॉन प्रति एकरी सोडावे व मिश्रसुक्ष्म अन्नद्रव्यांची एक फवारणी करावी.

**मिरची मध्ये कोणत्या जातीचा वापर करावा ?**

मिरची साठी बाजारपेठेत उपलब्ध नामांकित कंपन्याची संकरीत वाणे निवडावीत.

**मिरची, वांगे, टोमॅटो इत्यादींचे रोपे कोठे उपलब्ध आहेत.**

वरील सर्व पिकांची रोपे कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर मध्ये ऑर्डर प्रमाणे तयार करवून मिळतील.

**मिरचीतील फुलगळ थांबविणेसाठी काय सांगाल ?**

मिरची मध्ये फुलगळ थांबविणे व सेटींग वाढविणे यासाठी २ ग्रॅम १३:०:४५ ($KNO_3$) + २ मि.ली. २०% नायट्रोबेंझिन प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ही फवारणी प्रत्येक तोडयानंतर दिल्यास अधिक फुलधारणा मिळेल.

**खरबुज, कलिंगडमध्ये किती मायक्रॉन मल्चिंग पेपर वापरावा व एकरी किती खर्च येतो.**
खरबुज, कलिंगड मध्ये ३० मायक्रॉन मल्चिंग पेपर वापरावा, यासाठी एकरी ४ ते ५ रोल लागतात. प्रति रोल रू. २१५०/- प्रमाणे एकरी रू. ८६००/- ते १०७५०/- इतका खर्च येतो.

**खरबुज किंवा कलिंगड लागवडीची सविस्तर माहिती कुठे मिळेल ?**
यासाठी तुम्हाला कृषि विज्ञान केंद्र, सोलापूरशी ०२१७-२३५०३५९ या क्रमांकावर संपर्क साधावा लागेल.

**कलिंगड व खरबुज मधील 'व्हायरस' या रोगांचे नियंत्रण कसे करावे.**
रोगग्रस्त वेली अगोदर काढाव्यात. रोगाचा प्रसार टाळणेसाठी १ मी.ली. डि.एस.डब्लू + १ मी.ली. Jeus (ॲमीनो ॲसीड) + ०.५ मी.ली. कॉनफीडॉर (इमिडॅक्लोप्रीड) प्रति लिटर पाण्यात मिसळून ३-५ फवारण्या कराव्यात. तसेच पाण्याचे नियोजन व्यवस्थित ठेवावे.

**वेलवर्गीय पिकातिल 'नागअळी' चा बंदोबस्त कसा करावा** ?
वेलवर्गीय पिकामध्ये शोषकिडी व नागअळींचा प्रादुर्भाव कमी व्हावा यासाठी पिवळे चिकट सापळे प्रति एकरी २० ते २५ या प्रमाणे लावावेत. तसेच गरज भासल्यास ॲबामीसीन ०.५ मी.ली. / लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**कलिंगड, खरबुज मधील फळे तडकणे यावर काय उपाय आहे** ?
यासाठी एकरी १ किलो $CaNO_3$ + १ किलो बोरॉन ड्रिपमार्फत सोडावे व पाणी कमी-जास्त सोडू नयं. या पिकामध्ये पांण्याची गरज खूप कमी असते. त्यामुळे योग्य प्रमाणात अनुभवानुसार पाणी द्यावे.

## पशुवैद्यक शास्त्र :

**व्यासायीक पालनासाठी कोणत्या कोंबड्या पाळाव्यात** ?

व्यावसायीक कोंबडी पालन दोन प्रकारे असते.

१. मांसल (ब्रॉयलर) कोंबडी पालन : यासाठी खाजगी कंपन्याकडे १ दिवसाची पिल्ले मिळतात. उदा. व्हेंकटेश्वरा हॅचरीज्, सोलापूर ऑफिस फोन नं. ०२१७-२३११३१० सगुणा हॅचरीज् इत्यादी.
२. लेअर (अंडी उत्पादनासाठी) कोंबडी पालन : यासाठी व्हाईट लेग हॉर्न जातीचे पक्षी पाळतात. यामध्ये खाजगी कंपन्यानुसार वेगवेगळे पक्षी आहेत. व्हेंकटेश्वरा हॅचरीज् बी.व्ही-३०० इत्यादी.
३. मांसासाठी देशी पक्षांसारखे रंग असणा-या सुधारीत जाती पाळता येतात. यामध्ये अंडी व मांसासाठी असणा-या गिरीराज व वनराज जाती तसेच फक्त मांसासाठी असणारी कृषिब्रो जात पाळता येते. वनराज व कृषिब्रो याजाती प्रोजेक्ट डायरेक्टर, प्रोजेक्ट डायरेक्टोरेट ऑन पोल्ट्री, राजेंद्र नगर, हैद्राबाद -५०० ०३०, फोन नं.: ०४०-२४०१५६५१, २४०१७००० येथे मिळतात. गिरीराज व इतर सुधारीत जाती मिळण्याचे ठिकाणी आरे मिल्क कॉलनी, मुंबई - ४०० ०६५, फोन नं.: ०२२-२६८५८५७२, २६८५८८४१. सुधारीत कोंबड्यांच्या जातीसाठी नजिकच्या पशुवैद्यक दवाखान्यात संपर्क साधावा.

**परसातील कोंबडी पालनासाठी कोणत्या जाती चांगल्या आहेत ?**

| **जाती** | **संशोधन संस्था** | **उद्देश** |
|---|---|---|
| १. वनराजा | पी.डी.पी., हैद्राबाद | अंडी व मांस उत्पादन |
| २. ग्रामप्रिया | पी.डी.पी., हैद्राबाद | अंडी उत्पादन |
| ३. गिरीराजा | यु.ए.एस., बंगलुरू | अंडी व मांस उत्पादन |
| ४. कृषिब्रो | पी.डी.पी., हैद्राबाद | मांस उत्पादन |
| ५. गरीराजी | यु.ए.एस., बंगलुरू | अंडी उत्पादन |
| ६. कृष्णा-जे | जे.एन.के.व्ही.व्ही., जबलपूर | अंडी उत्पादन |
| ७. नंदनम्-९९ | तन्व्हसू, चेन्नई | अंडी उत्पादन |
| ८. कलिंगा ब्राऊन | सी.पी.डी.ओ. | अंडी उत्पादन |

**ब्रॉयलर पक्षांना शेडमध्ये किती जागेची आवश्यकता आहे ?**
ब्रॉयलर पक्षांना प्रति पक्षी १ चौ. फुट जागा लागते.

**देशी पक्षांचा व्यावसायीक पालनात पक्षांना किती जागा द्यावी ?**
शेडमध्ये मांसासाठी पालन केलेल्या देशी पक्षांना प्रति पक्षी ०.८ ते ०.९ चौ. फुट जागा वातावरणानुसार द्यावी.

**गिरीराज पक्षी किती अंडी देतात ?**
गिरीराज पक्षी साधारणपणे १३० अंडी वयाच्या ७२ आठवड्यापर्यंत देतात.

**ग्रामप्रिया पक्षी किती अंडी देतात ?**
ग्रामप्रिया जातीचे पक्षी साधारणपणे २०० ते २३० अंडी वयाच्या ७२ आठवड्यापर्यंत देतात.

**परसातील कोंबडी पालनात खुराडा कसा असावा ?**
खुराड्यात हवा खेळती रहावी. उन, वारा, पाऊस, मांजर, घार, कुत्रे यापासून पक्षांचा बचाव व्हावा. खुराडा जास्तीत-जास्त ५० पक्षांसाठी एक बांधावा. प्रति पक्षांना एक चौ. फुट जागा असावी. उंच ठिकाणी व उन्हाने तापणार नाही अशा ठिकाणी बांधावा.

**ब्रॉयलर पक्षांना कोणते लसीकरण करावे ?**

| **अ.क्र.** | **वय** | **लसीचे नाव** | **स्ट्रेन** | **देण्याची पध्दत** |
|---|---|---|---|---|
| १. | १ दिवस | मर्कस् रोग | एच.व्ही.टी | ०.२० मि.ली. कातडी खाली इंजेक्शन द्वारे |
| २. | ५ ते ७ दिवस | मानमोडी रोग | लसोटा | एक थेंब डोळयात टाकूण |
| ३. | १४ दिवस | आय.बी.डी. | जॉर्जीया | एक थेंब डोळयात टाकूण |
| ४. | २८ दिवस | मानमोडी रोग | लसोटा | डोळ्यातून / पाण्यातून |

**परसातील कोंबड्यांचे लसीकरण केव्हा व कोणते करावे ?**

| अ.क्र. | वय | लसीचे नाव | स्ट्रेन | देण्याची पध्दत |
|---|---|---|---|---|
| ४. | २१ दिवस | देवी | कोंबडयांचा देवी | मांसात / कातडी खाली |
| ५. | २१ दिवस | देवी | कोंबडयांचा देवी | मांसात / कातडी खाली इंजेक्शन द्वारे |
| ६. | ९ आठवडे | मानमोडी रोग | आर$_2$ बी (मुक्तेश्वर स्ट्रेन) | कातडी खाली इंजेक्शन द्वारे |
| ७. | १२ आठवडे | देवी | कोंबडयांचा देवी | कातडी खाली इंजेक्शन द्वारे |

टीप : ६ व ७ अ.क्र. चे लसीकरण प्रत्येक ६ महिन्यांनी पुन्हा द्यावे.

**मांसल पक्षांसाठी शेड कसे असावे ?**

शेड पूर्व-पश्चिम लांब असावे. पूर्व-पश्चिमच्या भिंती पूर्ण बांधाव्यात. दक्षिण उत्तर दिशिला शेडच्या जमिनिपासून एक फूट उंच भिंत बांधावी त्याचे वर जाळी लावावी. शेडची उंची मध्यभागी १२ फूट तर कडेला (दक्षिण - उत्तर बाजूला) ७ ते ८ फूट असावी. शेड जमिनीपेक्षा किमान एक फूट उंच असावी. शेडची रूंदी २३ ते २८ फूट असावे, लांबी आवश्यकतेनुसार असावी.

**लसीकरण कोणत्या वेळी करावे ?**

लसीकरण थंड वेळी - सकाळी लवकर किंवा संध्याकाळी करावे.

**मानमोडी रोगाबद्दल माहिती सांगावी ?**

कमी वयाच्या पक्षांमध्ये अचानक खुप मोठया प्रमाणात ८० ते १००% मरतुक होते. वयस्कर पक्षामध्ये हा रोग जास्त दिवस राहतो आणि रोगाची लक्षणे दिसून येतात. श्वाशोच्छवास घेणास त्रास होतो. तोंडाला सुज येते. अशक्तपणा येतो, हिरवी पातळ किंवा पाण्यासारखी संडास होते. मानेचा पखांचा व पायाचा पॅरॅलिसीस होतो. अंडी देणा-या पक्षांमध्ये अंडी उत्पादन घटते पातळ कवचाची अंडी मिळतात.

रोग आल्यानंतर हमखास औषधोपचार नाही, परंतु लक्षणे दिसताच लसोटा लसीकरण करावे. पक्षांची रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्याकरीता ए,डी$_3$, ई,सी व बी कॉम्प्लेक्स् जीवनसत्वे द्यावीत.

**शेळयांच्या महत्वाच्या जाती कोणत्या ?**

भारतीय जाती : उस्मानाबादी, सिरोही, ब्लॅक बेंगाल, बारबेरी, जमनापारी, मारवाडी, कच्छी, झाकराना, कश्मीरी.
